MHPA150004742026

**दिवाणी किरकोळ अर्ज क्र.७६/२०२६**

**भगवान रघुनाथराव सोळंके व इतर**

**विरुध्द**

**निरंक**

**निशाणी क्र.०१ खालील आदेश**

अर्जदारांनी प्रस्तुतचा अर्ज, मुंबई विनियमन (Regulation) अधिनियम, १८२७ च्या कलम २ अन्वये वारस प्रमाणपत्र मिळण्याकरिता दाखल केलेला आहे.

**०२.** अर्जदाराचे अर्जातील कथन असे आहे की, मयत नामे रघुनाथराव बाबुराव सोळंके हे दिनांक २७/०८/२०२४ रोजी मौजे ढेंगळी पिंपळगाव, ता.सेलू, जि. परभणी येथे मयत झाले. अर्जदार भगवान रघुनाथराव सोळंके, नातेवाईक क्र.१ विष्णु रघुनाथ सोळंके, इतर नातेवाईक क्र.२ आशामती मधुकर कदम, इतर नातेवाईक क्र.३ लक्ष्मी धोंडीराम मस्के, इतर नातेवाईक क्र.४ सुशीला अशोक निर्वळ व इतर नातेवाईक क्र.५ सुमीत्राबाई लिंबाजीराव मदम ही मयताची मुले आहेत. मयताच्या पश्चात अर्जदार व इतर नातेवाइकांशिवाय इतर कोणीही वारस नाहीत. अर्जदार व इतर नातेवाईकांना मयताचे कायदेशीर वारस म्हणून ओळखण्यासाठी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. त्यामुळे अर्जदारांचा अर्ज मंजूर करुन वारस प्रमाणपत्र त्यांच्या हक्कात देण्याची विनंती केली आहे.

**०३.** प्रस्तुत प्रकरणी, अर्जदारांच्या मागणी विषयी 'दैनीक देशोन्नती' या वर्तमानपत्रामध्ये दिनांक ०८/०५/२०२६ रोजी जाहीर प्रगटन (निशाणी १८) प्रसिध्द करण्यात आले व अर्जदारांच्या मागणी बाबत कुणाला हरकत, आक्षेप असल्यास त्यांनी न्यायालयासमक्ष हजर होऊन नोंदवावा असे कळविण्यात आले. परंतु, सदरचे जाहीर प्रगटन प्रसिध्द होऊनही अद्याप पावेतो कोणीही या अर्जास हरकत, आक्षेप नोंदविलेला नाही.

**०४.** अर्जदार यांनी अर्जातील कथनाच्या समर्थनार्थ शपथपत्र (निशाणी १०) शपथपत्र दाखल करुन निशाणी क्र.११ वर मयत रघुनाथराव बाबुराव सोळंके यांच्या मृत्युप्रमाणपत्राची पडाताळणी केलेली प्रत, नि.क्र.१२ ते १७ वर अर्जदार, इतर नातेवाईकांच्या आधार ओळखपत्राच्या पडताळणी केलेल्या प्रती दाखल करून पुरावा बंद केल्याची पुरसीस नि.क्र.१९ दाखल केली आहे.

**०५.** अर्जदारांच्या वतीने श्री.एस.एस.गजमल, वकील यांनी युक्तीवाद केला की, मयत रघुनाथराव बाबुराव सोळंके यांना अर्जदार व इतर नातेवाईकांशिवाय इतर कोणीही वारस नाहीत. पुढे त्यांनी अर्ज मंजुर करुन वारसाप्रमाणपत्र मिळण्याची विनंती केली. अभिलेखावरील कागदपत्रांचे सूक्ष्मपणे अवलोकन केले.

**०६.** अर्जदाराचा अर्ज, अर्जदाराने अभिलेखावर दाखल केलेला कागदोपत्री पुरावा आणि त्याचे विधिज्ञांनी केलेला युक्तीवाद यांचा विचार करता खालील मुद्दे माझ्या विचारार्थ येतात, व त्यापुढील निष्कर्ष मी त्या खाली दिलेल्या करणांकरिता मांडत आहे.

| अ. क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १ | अर्जदार मागणी प्रमाणे वारस प्रमाणपत्र मिळण्यास पात्र आहेत काय? | होकारार्थी |
| २. | आदेश काय ? | अंतिम आदेशाप्रमाणे |

## कारणमिमांसा

**०७.** अर्जदारांना वारसाप्रमाणपत्राच्या आधारे मयताची मिळकत त्यांच्या हक्कात किंवा नावाने करून घेण्याचा अधिकार प्राप्त होत नाही. वारस प्रमाणपत्र मयाताच्या मिळकतीचे व्यवस्थापन करण्यासाठी उपयोगात घेता येते. माननीय मुंबई उच्च न्यायालयांने ***ॲलायसीस मॅनुअल डिसुझा व इतर विरूध्द मॅरी कमला विल्यम मॅनुअल डिसूझा, २००६ (मुंबई) सी.आर. ५६*** मध्ये मांडलेले निरीक्षण असे आहे की, वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी दाखल केलेल्या अर्जात न्यायालयाला मयताच्या मिळकतीवरील वारसांचा अधिकार ठरविण्याची गरज नसुन फक्त अर्जदार हे मयताचे वारस असल्याबाबत घोषीत करावे. अर्जदारांच्या नावे वारस प्रमाणपत्र वितरीत केले म्हणजे मयताच्या मिळकतीवर वारसांचा हक्क निर्माण होतो असा अर्थ होत नाही किंवा मयताच्या मिळकतीमध्ये एखाद्याचा अधिकार हिराऊन घेतल्या जात नाही.

**०८.** तसेच, माननीय उच्च न्यायालय मुंबई यांनी ***गणपती विनायक आचवल, २०१४(६), एमएच.एल.जे. ६८३*** मध्ये नोंदविलेले निरीक्षण असे की, वारस प्रमाणपत्र दिले म्हणजे अर्जदारांना मयताचे सर्वाधिकार प्राप्त होत नाहीत. वारस प्रमाणपत्र मंजुर झाले म्हणजे अर्जदार हे मयताचे केवळ प्रतिनिधीक वारस असल्याचे घोषीत होते. वारस प्रमाणपत्र मंजुरी हे केवळ वारसांची विद्यमान स्थिती असल्याचे औपचारीक घोषणा असते किंवा मृत्युपत्राचा

व्यवस्थापक किंवा कायदेशीर प्रशासक हे न्यायालयाच्या आदेशा शिवाय मयताच्या मिळकतीचे व्यवस्थापन करू शकतात.

०९. असे असतांना एखादा व्यक्ती मुंबई विनियमन अधिनियम–VIII च्या नियमानुसार एखादा व्यक्ती पुढील परिस्थीतीमध्ये वारसाप्रमाणपत्र मिळण्यास पात्र आहे–१.जर त्याची वारस प्रमाणपत्र मिळण्याची इच्छा असेल तर, २.जर वारस म्हणुन त्याच्या अधिकाराबाबत काही वाद असेल तर किंवा मयताच्या नावे असलेली मिळकत ज्या व्यक्तीच्या ताब्यात असेल त्या व्यक्तीला विश्वासात घेवुन मयताच्या मिळकतीचे व्यवस्थापन करावयाचे असल्यास वारस प्रमाणपत्राची मागणी करू शकतो. सदरील प्रकरणामध्ये अर्जदारांनी वारस प्रमाणपत्राची मागणी केली आहे.

१०. अर्जदार यांनी शपथपत्राद्वारे दिलेला पुरावा व दाखल केलेल्या कागदोपत्री पुराव्या वरुन, अर्जदार व इतर नातेवाईक हे मयताचे वारस असल्याचे सिध्द होते. अर्जदार व इतर नातेवईक हे मयताचे वारस असल्याबद्दलच्या सदर प्रकरणात कोणाचाही आक्षेप आला नाही. त्यामुळे, अर्जदारांनी मागणी केल्याप्रमाणे अर्जदार व इतर नातेवाईक मयताच्या नावे वारस प्रमाणपत्र मिळण्यास पात्र आहेत. म्हणुन मी मुद्दा क्र.१ चे उत्तर होकारार्थी नोंदवुन खालील आदेश पारीत करतो.

## आदेश

०१. अर्ज मंजूर करण्यात येतो.

०२. अर्जदार व इतर नातेवाईक क्र.१ ते ५ मयत रघुनाथराव बाबुराव सोळंके यांचे कायदेशीर वारस आहेत असे नाममात्र घोषित करण्यात येते.

०३. मुंबई विनियमन (Regulation) अधिनियम, १८२७ च्या कलम ३ व ८ प्रमाणे अर्जदाराकडून विहीत न्यायालयीन शुल्क घेवून वारसा हक्क प्रमाणपत्र देण्यात यावे.

दिनांकः२२/०६/२०२६

**(विशाल आर. गटकळ)**
अति. सह. दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर,
सेलू, जि. परभणी.